कोविड-१९ च्या परिस्थितीमुळे वित्त विभागाने शिष्यवृत्ती/
फ्रीशीपच्या निधी वितरणावर घातलेले निर्बंध.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग,
शासन परिपत्रक,क्र: शिवृत्ती २०२१/प्र.क्र.७९/शिक्षण
मादाम कामा मार्ग ,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २२ जुलै,२०२१

वाचा - १. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचा शासन निर्णय क्र. विभशा-२०१८/प्र.क्र.१३५/ शिक्षण, दि. १९/०६/२०१८.
२.वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.अर्थसं २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.०४/०५/२०२०.
३.वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.अर्थसं २०२०/प्र.क्र.४८/अर्थ-३, दि.२४/०६/२०२१.

## परिपत्रक

देशातील व राज्यातील कोविड-१९ च्या परिस्थितीमुळे राज्याच्या आर्थिक स्थितीवर विपरित परिणाम झाल्यामुळे वित्त विभागाने वाचा क्र. २ येथे नमूद शासन निर्णयन्वये आर्थिक निर्बंध घातले आहेत. तसेच कोणताही अर्थसंकल्पीत निधी वित्त विभागाच्या मान्यतेशिवाय वितरीत करण्यास बंदी घातली आहे.

वित्त विभागाने वाचा क्र. ३ येथे नमूद शासन निर्णयन्वये या विभागाच्या शिष्यवृत्ती व फ्रिशीप यांच्या फक्त २५% इतकाच निधी वितरीत केला जाईल, असे निर्देश दिले आहेत.

या विभागाची काही प्रलंबित शिष्यवृत्ती व फ्रिशीप (२०१०-११ पासून) अदा करणे बाकी आहे. तसेच २०१९-२०, २०२०-२१ या वर्षातील महाडीबीटी प्रणालीवरील प्रलंबित दायित्व अंदाजे १८०० कोटी अदा करणे शिल्लक आहे. तसेच सन २०२१-२२ चे दायित्वसुध्दा या वर्षी येणार आहे. परंतु वित्त विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामुळे शिष्यवृत्ती व फ्रिशीपसाठी निधी देण्यास वित्त विभागाकडून पुरेसा निधी उपलब्ध होण्यास अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे.

काही शैक्षणिक संस्था/संघटना/महाविद्यालये/विद्यापीठे हे शिष्यवृत्ती व फ्रिशीप मिळण्यासाठी मा.उच्च न्यायालयात या विभागाविरुध्द याचिका दाखल करीत आहेत आणि मा.उच्च न्यायालयाने काही प्रकरणांमध्ये या विभागाला मा.उच्च न्यायालयात निधी जमा करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच निधी वित्त विभागाने दिला नाही तर अवमान याचिका दाखल होतात. त्यामुळे विनाकारण विभागाला त्रास सहन करावा लागत

Scanned with CamScanner

आहे. सध्या सर्व शिष्यवृत्ती डीबीटी वर ऑनलाईन असल्यामुळे ऑफलाईन निधी वित्त विभागाकडून उपलब्ध होत नाही. जो निधी मिळतो तो निधी थेट डीबीटीच्या पूल खात्यामध्ये (Pool Account ) जमा होतो.

या विभागाने वाचा क्र. १ येथे नमूद शासन निर्णयान्वये दि.१९/०६/२०१८ पासून पर्यायी न्यायव्यवस्था/ अर्धन्यायिक व्यवस्था गठीत केली आहे. सदर व्यवस्थेचा उपयोग न करता काही संस्था/महाविद्यालये/ विद्यापीठे/संघटना परस्पर मा. उच्च न्यायालयात जातात. त्यामुळे शासनाने काढलेल्या शासन निर्णय दि.१९/०६/२०१८ चे संस्था/महाविद्यालये/ विद्यापीठे/संघटना उल्लंघन करीत आहेत. याबाबत असे निर्देश देण्यात येत आहेत की, संस्था/विद्यापीठ /महाविद्यालये/संघटना यांनी मा. उच्च न्यायालयात जाण्यापूर्वी वाचा क्र. १ येथे नमूद शासन निर्णयान्वये उपलब्ध असलेली पर्यायी न्यायव्यवस्था/ अर्धन्यायिक व्यवस्थेचा उपयोग करावा. अर्धन्यायिक व्यवस्थेचा उपयोग केल्यानंतरच मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी. कोविड-१९ मुळे राज्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे वित्त विभागाने घातलेले निधी वितरणाबाबतचे निर्बंध लक्षात घ्यावे आणि राज्य शासनास सहकार्य करावे.

22/7/2021

(जे. पी. गुप्ता) भा.प्र.से.
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.सरकारी वकिल, मा.उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर/औरंगाबाद यांनी वरील बाब मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणावी.
२. मा. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
३. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे.
४. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग.
५. सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग.
६. संबंधीत सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, इतर मागास बहुजन कल्याण विभाग,मंत्रालय,मुंबई.
७. प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक,इतर मागास बहुजन कल्याण विभाग,मंत्रालय,मुंबई.
८. निवड नस्ती (शिक्षण)

Scanned with CamScanner